डिसेंबर २०२० अंक २

*Magazine on Low External Input Sustainable Agriculture*

# LEISA INDIA

लीजा इंडिया–मराठी



## कृषीपर्यावरणीय शेती

मूळ इंग्रजीमध्ये प्रकाशित झालेल्या निवडक लेखांचे मराठी भाषेत संकलन

LEISA INDIA
लीजा इंडिया–मराठी

## डिसेंबर २०२० अंक २

लीजा-इंडिया हे नियतकालिक अे.एम.ई. फाऊंडेशन तर्फे प्रकाशित केले जाते. त्याची आवृत्ती मराठी भाषेत युवा रुरल असोसिएशन, नागपूर मार्फत लेखांचा मराठी अनुवाद करून प्रकाशित केली जाते.

**मुख्य संपादक**
के.व्ही.एस प्रसाद
अे.एम.ई.फाउंडेशन

**व्यवस्थापकीय संचालक**
टी.एम राधा
अे.एम. ई. फाउंडेशन

**मराठी संपादन**
दत्ता पाटील
युवा रुरल असोसिएशन, नागपूर

**अनुवाद समन्वयन**
वीणा, अे.एम.ई.फाऊंडेशन

**युवा रुरल असोशिएशन**
123/9 कुंभारे बिल्डींग, प्रेरणा कॉन्व्हेंट जवळ,
न्यु अमर नगर, चिखली रोड, मानेवाडा रिंग रोड
नागपूर-440034
फोन : 7083328154 / 9028090056.
इमेल : info@yraindia.org
वेबसाईट : www.yraindia.org

**अे.एम.ई. फाउंडेशन**
नं. 204, 100 फूट रिंग रोड, 3 फेज,
बनशंकरी ,2 रा ब्लॉक, 3 री स्टेज,
बंगलोर - 560085, भारत
फोन : +91-080-2669 9512, +91-080-26699522
फॅक्स : +91-080-2669 9410
ईमेल : leisaindia@yahoo.co.in
वेबसाईट : www.leisaindia.org

**मुद्रक :** दिनेश ग्राफीक, नागपूर मो. 9422119631

**मुख पृष्ठ फोटो :** www.leisaindia.org

**लीजा इंडिया** हे जागतीक शेती नेटवर्क चा एक भाग आहे. भारतामध्ये हे नियतकालिक इंग्रजी, कन्नड, तमिळ, हिंदी, तेलगू, ओरिया, पंजाबी व मराठी भाषेतून छापले जाते. भारताशिवाय ते लॅटीन अमेरिका, पश्चिम आफ्रिका, पूर्व आफ्रिका, ब्राझील व चीन या देशातून प्रकाशित होते.

नियतकालिकातील लेखन तपशील योग्य व काटेकोर असल्याची काळजी संपादकानी घेतलेली आहेय. परंतु मूळ लेखातील मते व अनुभव हे लेखकाचे वैयक्तिक असतील. तसेच लेखाच्या झेरॉक्स प्रती इतरापर्यंत मुख्य हस्ते प्रसारीत करण्याची खुली परवानगी आहे.

संपादकीय

प्रिय वाचक,

## ''लिजा'' टीम तर्फे शुभेच्छा !!!

डिसेंबर २०२० चा अंक कोविड-१९ च्या साथीमुळे आपल्याकडे उशीरा पोहोचतोय या बद्दल क्षमस्व. राष्ट्रीय पातळीवर एका बाजुला सुधारित तीन कृषि कायद्याबद्दल खूप उलथा पालथ होत आहे आणि त्याच वेळी दुसऱ्या बाजूला कृषि व कृषक यांच्या एकंदर विकासासाठी वाहून घेतलेल्या या नियतकालिका द्वारे पर्यावरणाशी सुसंगत शेती बद्दल मांडणी करणे हे कदाचित एकंदर आर्थिक व राजकीय माहोलशी सुसंगत वाटणार नाही. परंतू एकूणच वैश्वीक पातळीवर होणारे अस्माणी बदलांचा विचार केला तर मात्र नक्कीच आपल्याला पटेल की हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. असा विचार आपल्या देशात अनेक वर्षापासून सुरु आहे व त्या दृष्टीने तसे प्रयोग व प्रयत्न केले जात आहेत. त्यापैकी काही यशस्वी प्रयत्नांची मांडणी या ठिकाणी करण्यात आली आहे. या नियतकालिकातून मांडणी करण्याचा हेतु केवळ शेतकरी व शेती पुरता मर्यादित नाही तर यातून आपले प्रतिनिधी, सरकार, कृषी व पर्यावरण तसेच इतर शासकीय विभाग, तेथे काम करणारे अधिकारी, कृषि विद्यापीठे, कृषिविज्ञान केंद्रे यांच्या पर्यंत ही मांडणी पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. वाचक या नात्याने आपली मते जरुर कळवा. इतरापर्यंत हा संदेश पोहोचवा ही विनंती.

**संपादक मंडळ**

**लीजा** म्हणजेच बाहेरील लागतीचा अत्यल्प वापर व शाश्वत शेती प्रणाली होय. ज्या शेतकऱ्यांना पर्यावर्णिय संतुलन न बिघडविता शेती उत्पादन व उत्पन्न वाढवायचे आहे अशा शेतकऱ्यांसाठी हा एक तांत्रिक व सामाजिक पर्याय आहे. स्थानिक संसाधनाचा व नैसर्गिक प्रगती यांचा शेती प्रणाली मध्ये यथायोग्य वापर आणि गरज पडल्यास केवळ काही बाह्य लागतीचा सुरक्षित व सक्षम वापर हे लीजाचे तत्व आहे. स्वतःचे उपजत ज्ञान, कौशल्य, मुल्ये व संस्कृतीच्या आधारावर आपले भविष्य उज्वल करण्याची उर्मी असलेल्या महिला व पुरुष शेतकऱ्यांचे हे एक उर्जास्थान आहे. शेतकरी आणि संबधित घटकांच्या सहभागी पद्धतीने क्षमतावृद्धी करणारं हे एक माध्यम आहे. एकंदर शेती प्रणाली सुधारणा व बदलत्या गरजांनुसार त्यामध्ये बदल करणे आणि होणारे बदल योग्य प्रकारे आत्मसात करण्यासाठी लीजा हे एक मार्गदर्शन आहे. लीजाद्वारे शेतीच्या पारंपारिक ज्ञान व शास्त्रीय ज्ञानाचा काळजीपूर्वक मिलाप केला जातो व पुढे त्या आधारावर आवश्यक ध्येय धोरणे तयार करण्यासाठी प्रयत्न केला जातो. अशा धोरणांचा वापर, प्रसार, प्रचार करण्याचे देखिल हे साधन आहे. लीजा ही एक संकल्पना आहे, एक दृष्टीकोन व राजकीय संदेश आहे.

**MISEREOR** founded in 1958 is the German Catholic Bishops' Organization for Development operation. For over 50 years MISEREOR has been committed to fighting poverty in Africa, Asia and Latin America. MISEREOR's support is available to any human being in need - regardless of their religion, ethnicity or gender. MISEREOR believes in supporting initiatives driven and owned by the poor and the disadvantaged. It prefers to work in partnership with its local partners. Together with the beneficiaries, the partners involved help shape local development processes and implement the projects. This is how MISEREOR, together with its partners, responds to constantly changing challenges, (www.misereor.de, www.misereor.org)

**अे.एम. ई.** फाऊंडेशन पारंपारिक ज्ञान व नवनवीन तंत्रज्ञान यांचा संगम करून अत्यल्प बाह्य लागतीच्या तत्वावर नैसर्गिक संसाधनाचे उत्तम व्यवस्थापन सुनिश्चित करीत शाश्वत उपजिविकेला प्रोत्साहन देणारी संस्था आहे. ह्या हेतूने दख्खन भागात ही संस्था लहान व छोट्या शेतकरी कुटुंबासोबत,शिक्षण,प्रशिक्षण,पारंपारिक ज्ञान साठवण, विविध संस्था संघटना सोबत अनुभवांची देवाण घेवाण करीत शेती पद्धतीचे विविध पर्याय सातत्याने शोधत असते. अगदी तळागाळात जाऊन गावातील इच्छुक शेतकऱ्यांसोबत त्यांना विविध फायदेशीर पर्याय उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न ह्या संस्थेतर्फे केले जातात. अशा ठिकाणी इतर अनेक शेतकरी, संस्था-संघटनांना शिकण्याची संधी म्हणून कार्यक्रम आयोजित केले जातात.

**युवा रुरल असोसिएशन** ही संस्था नैसर्गिक संसाधनाच्या संवर्धनासोबत त्यांच्या योग्य व्यवस्थापनावर आधारित ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात गरिबीवर मात करण्यासाठी नवनवीन उपजिवकेचे प्रयोग व पर्याय निर्माण करण्यास लहान शेतकरी, शेतमजूर, आदिवासी व ग्रामीण गरीब समुहास मदत करीत असते. यामध्ये माहितीसाठी विशेष प्रयत्न केले जातात.शेती व शेतकरी संबधित विविध प्रश्नांवर धोरणात्मक पातळीवर योग्य ते निर्णय व बदल घडवण्याचा विशेष प्रयत्न इतर राज्य व राष्ट्रीय पातळीवरील संघटनां सोबत केले जातात. लीजा इंडियांचे नियत कालिक मराठी मध्ये प्रकाशित करण्याचा उपक्रम हा देखिल त्याचाच एक भाग आहे.

# अनुक्रमणिका



04-05 **कृषीपर्यावरणीय शेती पद्धतीच्या शाश्वतीसाठी आधाराची आवश्यकता**

M. N. Kulkarni

पारंपारीक पध्दतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये शाश्वत उत्पादन देणाऱ्या पर्यावरणास अनुकूल असणाऱ्या शेतीकडे उत्साहवर्धक कल आहे. जर शेतकऱ्यांना कृषीपर्यावरणीय शेती पध्दतीकडे मोठया प्रमाणात वळवायचे असेल तर त्याचे ज्ञान वाढविण्यासाठी पुरेसे पाठबळ देण्याची नितांत गरज आहे.



06-09 **स्थानिक संस्कृती जतन करून रोजगार वाढ**

Lakshmi Unnithan

नैसर्गिक साधनसंपत्तीची जपणूक करत, भविष्यातील अन्नधान्याची गरज भागवणे, अन्नातील पोषकता वाढवणे व त्याच वेळी कृषी आधारित रोजगार वाढवणे ही एकविसाव्या शतकातील मोठी आव्हाने आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नवीन मार्ग शोधावे लागतील, वेगळे विचार करावे लागतील आणि नवीन भागीदारी तपासून पहावी लागेल.



10-12 **कृषीपर्यावरण किंवा पर्यावरण अनुकुल शेतीपद्धतीस प्रोत्साहन देण्यासाठी क्षमता वाढविणे हिच गुरुकिल्ली आहे.**

Siva Muthuprakash and Shashank Deora

ओरीसातील आदीवासी जमातींच्यात असे आढळून आले की, महिला शेतकऱ्यांवर लक्ष केंद्रीत करून क्षमता वाढविण्यासाठी उपक्रम राबविणे मोलाचे ठरेल ज्यामुळे शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब वाढून राहणीमान सुधारणा, कौटुंबिक पोषण सुधारणा आणि सबलीकरण यासारखे अनेक फायदे या कुटुंबांना मिळतील.



13-16 **शेतकरी पृथ्वीचा पालनकर्ता**

C F John

अशा वेळेस, जेव्हा आपल्या विचारांना व प्रगतीला कुठल्याही मर्यादा नसतात, तेव्हाच शेतकरी व बियाणे हे मर्यादेत राहून जीवनाचे अमर्याद जग फुलवितात. आपण सतत जे शोधत असतो ते सूप्तावस्थेतील खजिन्यासारखे या गतिशील शरीरात, आपल्या शरीरात व पृथ्वीमध्ये असतात.



17-17 **कृषक दैनंदिनी शाश्वत उत्पादन व सामुहिक विपणन शेतकऱ्यांसाठी एक नवा मार्ग**

Dr. Rajendra Upreti



18-20 **भारतातील कृषी पर्यावरणासाठी महिलांची साखळी शक्ती**

Soumya Sankar Bose and Amrita Gupta

अमृतभूमी या संस्थेने कर्नाटकात बेंगलोर जवळ कृषी पर्यावरण शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापण केले आहे. पर्यायी शेतीचे मॉडेल या संस्थेने निर्माण केले आहे. लाव्हिया कंम्पॅसिना चे सदस्यत्व असलेल्या या संस्थेच्या सेंटरव्दारे 'शेतकरी ते शेतकरी' या तत्वाला अनुसरून प्रशिक्षण दिले जाते.



# कृषीपर्यावरणीय शेती पद्धतीच्या शाश्वतीसाठी आधाराची आवश्यकता

M. N. Kulkarni

पारंपारीक पध्दतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये शाश्वत उत्पादन देणाऱ्या पर्यावरणास अनुकूल असणाऱ्या शेतीकडे उत्साहवर्धक कल आहे. जर शेतकऱ्यांना कृषीपर्यावरणीय शेती पध्दतीकडे मोठया प्रमाणात वळवायचे असेल तर त्यांचे ज्ञान वाढविण्यासाठी पुरेसे पाठबळ देण्याची नितांत गरज आहे.



नारळाच्या पानांचे तुकडे करुन फळबागांना टाकतांना

पारंपारीक पध्दती आजच्या काळातही संयुक्तीक आहे. त्या लहान व सिमांत शेतकऱ्यांचा कणा आहेत. आधुनिक शेतीकडे वळतांना शेतकऱ्यांनी पारंपारीक पध्दती अवलंबणे बंद केले. तरीही काही शेतकरी अजूनही ती अवलंबत आहे. सेंद्रिय शेतीवर अधिक भर दिल्यास संसाधन व्यवस्थापनाच्या पारंपारिक पध्दतीला महत्व पुन्हा प्राप्त होईल. पारंपारीक पध्दतीतील शेणखत मूल्यवर्धनासहीत वापर केले गेले पाहीजे. कंपोस्ट कल्चर रॉक फॉस्फेट किंवा नाडेप पध्दतीने शेणखताचे समृध्द कंपोस्टमध्ये रूपांतरित केले जाते. यापूर्वी कर्नाटकच्या उत्तर भागात जनावराचे लघवी जमा करून खत खड्डयात टाकले जायचे त्यामुळे शेणखताचे मुल्यवर्धन होते. आज ही प्रथा वेगाने नाहीशी होत आहे. पारंपारीक सेंद्रीय पध्दतीचे पुनरूजीवन आणि प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य संस्थांनी प्रयत्न केले आहेत उदाहरणार्थ कर्नाटक सरकारने सेंद्रीय शेती प्रकल्पाव्दारे कंपोस्ट जिवाणू संवर्धक देऊन दर्जेदार कंपोस्ट खत तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले गुरांच्या मूत्रात मिसळून सेंद्रीय युरीया तयार करण्याचे प्रशिक्षणही शेतकऱ्यांना देण्यात आले. पिकगेनायकहल्ली तालुक्यातील कोरेगेरे गावाचे प्रगतशील शेतकरी श्री. के. आर राजेशेखरैय्या यांनी गोमुत्र राखेत मिसळून खत म्हणून वापरले त्यांचा त्याचे चांगला फायदा झाला.

इतरही अनेक उपयुक्त पध्दती आहेत परंतु त्या वापरल्या जात नाहीत. उदाहरणार्थ तलावातील गाळाच्या वापरामुळे मातीची जलधारण क्षमता वाढली, हिवाळी नांगरणीमुळे पिकांचे अवशेष व तण जमिनीत गाडले जातात. मेंढ्या शेतात बसविण्याची पध्दत काही पारंपारीक क्षेत्रात अद्याप वापरली जातात. फारच थोड्या ठिकाणी, जसे गुरेढोरे बसविणे (रायपूर जिल्हा) आणि गधे बसविणे (तमकूर व आरसीकेरे) येथे पाहायला मिळतात. मोठ्या प्रमाणात शेण व गोमूत्राचा शेतात पूर्नवापर केला गेला पाहिजे अन्यथा ते वाया जाईल.

### संसाधनाचे पुर्नवापर

बदलत्या हवामानात आणि निविष्ठांच्या वाढत्या किंमतीत, नैसर्गिक संसाधनाचा पुर्नवापर अत्यंत महत्वाचे आहे. पिकांचे अवशेष व गोमुत्राचा योग्य वापरासंबधी शेतकऱ्यांमध्ये बरीच जागरूकता दिसून येते. दशकापूर्वी आपण शेतांमध्ये पिक अवशेष जळतांना पाहिले आहेत. एकदा पिकांचे अवशेष शेती बाहेर गेले किंवा जाळले गेले तर त्यातील पौष्टिक अन्नद्रव्ये कायमचे नाहीसे होतात. यापूर्वी तुमकूर, हसन, मांड्या, पिक्कामंगोलर इत्यादी नारळ पट्ट्यांमध्ये शेतकरी नारळ फळांची स्वस्त दराने विक्री करीत असत.

**वाढत्या जनजागृतीमुळे शेतकऱ्यांनी फळांचे लहान-लहान तुकडे करून पुन्हा मातीत मिसळण्यात सुरुवात केली आहे.**

प्राध्यापक नानजंदप्पा (टिपटूर, तुमकर जिल्हा) हे एक शिक्षणतज्ञ सेंद्रीय शेतकरी या नात्याने नारळाचे बारीक तुकडे करून फळबागेत मिसळलेत. मागील दहा वर्षापासून ते शून्य मशागत व संसाधनाचे पुर्नवापरासंबंधी जनजागरण करीत आहे. त्याचप्रमाणे, धारवाड जिल्ह्यातील कांपलीकोप्प्या गावात राहणारे लहान शेतकरी श्री मल्लेशप्पा हळदाच्या शेतीतून काहीही बाहेर जात नाही. त्यांनी वनशेती पध्दती स्विकारली असून बांधावर चारा लागवड करीत आहेत. सर्व पिक अवशेषांचे कंपोस्टमध्ये रूपांतरीत करून शेतात परत टाकले जातात. फळझाडांची पाने चरांमध्ये आच्छादली जातात. त्यांच्या जवळ चार दुधाची जनावरे आहेत. ग्रामपंचायतीच्या मदतीने गोबर गॅस युनिटचा फायदा घेता येतो. जनावरांना चारा देऊन शेण गोबर गॅसमध्ये वापरले जाते. त्यातील निघणारी स्लरी खड्ड्यात जमा करून नंतर शेतात टाकली जाते. मल्लेशप्पा म्हणतात. *"माझ्या शेतातून फक्त धान्य, दूध आणि चाऱ्यांची मुळेच बाहेर जातात."*

आंध्रप्रदेशातील विझाग जिल्ह्यातील मदुगाला मंडळातील सागरम गावातील एक लहान शेतकरी श्री रविकुमार प्रखरतेने सांगतात. की, "बाह्य संसाधनावर मी फार कमी अवलंबून आहे. माझ्याकडे असलेल्या चारा कटरचा वापर करून चारा कार्यक्षमतेने वापरतो आणि शेणखताच्या खड्डात कचरा कुजविणारी बुरशी टाकतो." त्यांचेकडे सात गाई आणि दोन म्हशी आहेत. ते एका एकरावर चारा वाढवितात. शेतात तयार होणारे आठ टन शेणखत पिकांकरीता वापरतात. ते कचरा कुजविणाऱ्या बुरशीचा वापर करतात, तसेच संसाधनाचा कार्यक्षम पुर्नवापरासाठी अझोला लागवडीचा अवलंब करतात. रवीकुमारांनी आपल्या सात एकर शेतीत बहुपिक पध्दतीचा वापर करतांना पेरू, नारळ, केळी, धान आणि वैरण लागवडीसह अनेक पिके लावतात.



रविकुमार आपल्या शेतातील जनावरांसाठी चारा वाढवितांना

### पुढील मार्ग

कृषी पर्यावरणीय शेती अजूनही विखूरलेली दिसते. कार्यक्षम पुर्नवापरासाठी कमीत कमी एक दुभती गाय, काही बकऱ्या,शेळ्या, वैरण पिके, झाडे आणि पिक अवशेषांचे कंपोस्ट तयार करणे गरजेचे आहे. बऱ्याच बाह्य संस्था वैकल्पिक पध्दतींना प्रोत्साहित करतात, परंतु त्या प्रकल्पाची आवश्यकता व कालावधी पर्यंत पर्यादित असतात. उदाहरणार्थ, नाबार्डने आपल्या पाणलोट क्षेत्रात हवामान अनुकुल हिरवळीच्या खत गाळाचा वापर खोल नांगरणी व गांडूळ खताद्वारे संसाधनाच्या कार्यक्षम पुर्नवापर करण्यावर भर दिला. कृषी विभाग आणि कृषी विज्ञान केंद्रे कचरा कुजविणाऱ्या बुरशी जैविक कल्चरचा पुरवठा करून शेणखताला कंपोस्ट बनवून मुल्यवर्धित करण्यासाठी प्रोत्साहन देतात. म्हणूनच या संबंधीचे ज्ञानाचा प्रसार करण्याची तातडीची गरज आहे. तसेच शेतकऱ्यांना कृषीपर्यावरणीय पर्यावरण अनुकुल शेतीपध्दतीकडे वळविण्यासाठी पुरेसा पाठिंबा देण्याची आवश्यकता आहे.

**M.N. Kulkarni**
Addl. Chief Programme Executive
BAIF Institute for Sustainable Livelihoolds and Delopment, C/o. TRICOR, Loneru Lakshmaiah Street, Mogalarajpuram, Vijaywada, Andhra Pradesh
Email-mnkulkarni65@gmail.com

अनुवाद : डॉ. विनोद अ. खडसे

*Source : Sustaining agroecological farming practices, LEISA India September, 2019.*

# स्थानिक संस्कृती जतन करून रोजगार वाढ

Lakshmi Unnithan

**नैसर्गिक साधनसंपत्तीची जपणूक करत, भविष्यातील अन्नधान्याची गरज भागवणे, अन्नातील पोषकता वाढवणे व त्याच वेळी कृषी आधारित रोजगार वाढवणे ही एकविसाव्या शतकातील मोठी आव्हाने आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नवीन मार्ग शोधावे लागतील, वेगळे विचार करावे लागतील आणि नवीन भागीदारी तपासून पहावी लागेल.**



शहरी भागातील तरुण-तरुणी शेतीच्या उपक्रमात सहभागी होताना.

अन्नधान्य पिकवण्याच्या पद्धती, त्यावरील प्रक्रिया, साठवणूक, वाहतूक, वाटप आणि प्रत्यक्ष वापर इ. बाबत सतत होणारे बदल याचा विचार करणे ही काळाची गरज आहे. अन्न सुरक्षा, वातावरण सुसंगतपणा, स्थानिक रोजगार व अर्थकारण, नवीन पिके घेणे, आहार सवयीतील बदल, पोषकता व आरोग्य संवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, जैवविविधता इ. महत्त्वाच्या बाबींसंदर्भात 'कृषी पर्यावरण'ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पण यामध्ये लहान शेतकऱ्याना, युवक, महिला या सर्वांना सामील करून त्यांच्या सहकार्याने कृषी पर्यावरणाला प्रोत्साहन देणे शक्य आहे.

तसेच या बाबतीत समस्यांना वेगळ्या रीतीने हाताळणे, समोरची आव्हाने वेगळ्या दृष्टीने पाहणे, वेगवेगळ्या व नवीन कल्पना समोर आणणे, स्थानिक रोजगार व अर्थकारण बळकट करण्याचे विविध मार्ग चोखाळणे, अन्नातील पोषकता वाढवणे इ. बद्दल सक्रिय असलेल्या लोकांना संलग्न करणे महत्त्वाचे आहे. या प्रयत्नामध्ये सविता उदय यांच्याशी जवळीक निर्माण झाली. त्यांचा आयुष्यातील प्रवास अगदी रंजक आहे. त्या शिक्षक आहेत, लोक साहित्यिक आहेत, सांस्कृतिक वारसा जपणारे 'बुडा लोकसाहित्य केंद्राच्या' त्या संस्थापक आहेत. हे बहुआयामी व्यक्तिमत्वसोबत असलेल्या सर्वांना लोभवून टाकते. त्यांच्या आयुष्यामध्ये सातत्याने त्यांनी स्थानिक रोजगार व अर्थकारण, अन्न, आहार सवयी, पीक उत्पादनामध्ये बदल, आहारातील पोषकता, बदल, आरोग्य, नैसर्गिक संसाधानाचे संरक्षण व जैवविविधता अशा अनेक पैलूंवर अपार कष्ट केले.

पीएच.डी. झाल्यानंतर सविता उदय यांनी काही शाळामध्ये शिक्षक म्हणून काम केले. पण लवकरच साचेबद्ध शिक्षणाला त्या कंटाळल्या आणि आपल्या पद्धतीने वेगळ्या प्रकारच्या शाळांमधून त्या शिकवू लागल्या. अगदी अहमदाबाद, बेंगळुरू ते मस्कतपर्यंत अगदी पारंपारिक

शाळांपासून ते प्रक्रिया शाळा बेंगलोर व व्हेली शाळा बेंगलोर अशा अपारंपारिक/पर्यायी शाळांमधून पण शिक्षण दिले. सविता शाळेत भूगोल हा विषय शिकवत असतं. त्यांच्या असे लक्षात आले की, मुलांना जमीन, नद्या, जंगल या बाबतीत फार काही माहिती नाही आणि म्हणून निसर्गाशी जोडून रहावे या उद्देशाने मुलांसाठी त्यांनी वेगळे वर्ग घेण्यास सुरुवात केली. काही दिवसात त्यांनी शाळेची नोकरी सोडून दिली व या विषयावर एक अभ्यासक्रम तयार केला व त्याचे शिक्षण मुलांना देण्यास सुरुवात केली. शाळेपेक्षा मोकळ्या वातावरणात मुले जास्त चांगले शिकू शकतात असा त्यांचा ठाम विचार/विश्वास होता.

सविता उदय यांनी योजिलेल्या अभ्यास दौऱ्यामध्ये विविध शाळा, महाविद्यालये व विद्यापीठातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार नद्या, समुद्र, जंगल अशा समृद्ध नैसर्गिक भागातून सहल करण्याची मुभा देण्यात आली. या मधून एकंदर निसर्ग रचना, पर्यावरण विविधता, जैविक विविधता अशा परिसरात राहणारे आदिवासी व त्यांच्या जीवनाबद्दलसुद्धा बरीच माहिती व ज्ञान त्यांना घेता आले. काही विद्यार्थ्यांनी अगदी एक आठवडा ते एक महिना असे अभ्यास दौरे केले. त्या दरम्यान नद्या, जंगल, समुद्र, तेथील 'हलाक्की' व 'सिद्दी' आदिवासी लोक यांच्यासोबत वेळ घालवला व तज्ज्ञांकडून या बाबत भरपूर ज्ञान मिळवले. (बॉक्स १ पाहावा). याच दरम्यान वेगळ्याच पद्धतीने त्यांनी आदिवासी लोकांना त्यांचे लोक साहित्य विद्यार्थ्यांना शिकवण्यास मदत केली. सर्वांनीच त्याचे खूप कौतुक केले.

कर्नाटकात 'बुडा' म्हणजे सुरुवात-तळ किवा पाया. त्यावरच सर्व काही बांधता येते. 'बुडा' हे लोक साहित्य सध्या दोन ठिकाणावरून चालते. अंकोला जिल्ह्यातील होन्नावर आणि अंगडीबैल इथून, सुरुवातीला सविता उदय यांनी याची सुरुवात त्यांच्या आई-वडिलांच्या घरातूनच (होन्नावर) केली. त्यांचे आई-वडील डॉ. शांती नायक व डॉ. एन. आर. नायक, दोघेही कन्नड प्राध्यापक, या दोघांनीही उत्तर कन्नड विभागाचे लोक साहित्य प्रसारित करण्यासाठी आयुष्यातील 40 वर्षे कठोर कार्य केले. त्यांनी सुमारे 80 पुस्तके लिहिली आहेत. लोक साहित्याचे दस्तऐवजीकरण खेळांमध्ये, लेखन साहित्यामध्ये, कला, हस्तकला, नाच, खाद्य, पेय, गीत, औषधी वनस्पती आणि रीतीरिवाज अशा विविध गोष्टीतून केलेले अनुभवायला, पाहायला मिळते. बुडा कार्यक्रमांचे आयोजन हे या दोन ठिकाणावर केले जाते ज्यातून लोकांचे जीवन, संस्कृती व निसर्गासोबत असलेले नाते यांचे प्रकटीकरण होते व त्या बाबतचे ज्ञान प्रसारित केले जाते. 'बुडा लोक साहित्य'चा अनुभूतीतून शिक्षण या विचारसरणीवर विश्वास आहे आणि त्यातूनच शाळा व विद्यालये यांच्यासाठी पुढील प्रकारचे कार्यक्रम निर्माण केले गेले आहेत. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थी उत्तर कन्नडमधील नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा शिकण्याचा व जपण्याचा हेतू साध्य करतात.

**नद्यांच्या खोऱ्यातील अभ्यास दौरे**

या मध्ये शरावथी नदीच्या उगमापासून ते ही नदी अरेबियन समुद्राला जिथे मिळते तिथपर्यंतचा सर्व परिसर या कार्यक्रमामध्ये अंतर्भूत आहे. हा सर्व प्रवास बोटीतून, चालत टर्नेकिंगद्वारे पार केला जातो. या अभ्यासात विद्यार्थ्यांचा सुंदर अशी तयार झालेली ऐतेहासिक बेटे, नदी पत्राचा प्रवास, वाहत्या नदीमुळे घडून आलेले मातीचे विविध स्तर, लोकांची बोली, हस्तकला, खाद्य, संगीत, देव आणि त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती इ. बाबींचा अभ्यास होतो.

**समुद्र अभ्यास दौरे**

होन्नावर ते गोकर्ण असा बीच ज्यामध्ये समुद्र किनारा, उंच टेकड्या, डोंगर याचा समावेश आहे. हा भाग एक वेगळ्या प्रकारे ट्रेकींगसाठी योग्य आहे. या पट्ट्यात 'हलक्की' आदिवासी व मासेमार समाजातील लोक भेटतात.

**जंगल दौरे**

उत्तर कन्नड विभागातील अंगडीबैल जिल्ह्यातील जंगलामध्ये, शेतामध्ये, डोंगरावर, पर्वत, नद्या नाल्यांनी वेढलेल्या भाताच्या खाचरांमध्ये विद्यार्थी राहतात. या भागात राहणाऱ्या 'हलक्की', 'गामोक्काळू', 'गोन्ड', 'सिद्धीस' व 'करे ओक्काळू' या लोकांच्या समृद्ध लोक संस्कृतीचे दर्शन घडवून आणले जाते. यातून विद्यार्थी त्या लोकांचे खाद्य, कला, हस्तकला, संगीत, नाच, आर्किटेक्चर आणि त्यांचे जीवनमान याचा अभ्यास करतात.

पश्चिम घाटीतील हिरव्यागार, ओलसर, पानगळ होणाऱ्या जंगलामध्ये ते टर्नेकिंग करतात. गावांमध्ये कॅम्पस् भरवतात. ट्रेकींग अगदी 'यांना मोतीगुडा' या अगदी उंच शिखरावर देखील केले जाते. या पर्यावरणाचा व चा येथील मानवी जीवनावर कसा परिणाम होतो व लोक त्यांच्या आजूबाजूच्या वातावरणाशी कसे जुळवून घेतात याचा विद्यार्थी अभ्यास करतात.

**शेतावर शिकणे**

सविता उदय यांना केवळ शिकवण्यामधून पूर्ण समाधान मिळत नव्हते. तिच्या अंतर्मनाची वेगळीच काही तरी ओढ होती. ती ओढ तिला तिच्या मूळ भूमीकडे घेऊन आली. व्हॅली स्कूलमध्ये शिकवताना स्व:तच्या जमिनीवर तिला शेती करण्याचा प्रसंग आला. अगदी पुढच्या पिढीला उपयुक्त होईल असे शिक्षणाचे वेगळे रूप, ज्ञान पसरवण्याचे कार्य सविताला करायचे होते. शेतीकडे परत येण्याची तिची ओढ एवढी प्रचंड होती की तिने पश्चिम घाटातील उत्तर कन्नड विभागातील, गोकर्णपासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर अंगडीबैल गावात नवीन २५ एकर जमीन खरेदी केली. ती पुन्हा पुन्हा सांगत असे की तिला शेती

कशी करायची हे माहीत नव्हते. ती कधीच शेतीवर काम करत नव्हती. सुरुवातीच्या दोन वर्षाच्या काळात तिच्या लक्षात आले की शेती करणे हे कठीण काम आहे आणि तिने आयुष्यात जणू मोठी चूक केली आणि ती शेतीवर आली व शेती विकत घेतली. तिला जेवढे सोपे वाटले होते तेवढे ते सोपे नाही हे तिला उमगायला लागले. त्यांचे पती टांझानियामध्ये काम करीत होते आणि म्हणून सुद्धा त्यांनी चुकीचा निर्णय घेतला असे सुरुवातीला वाटत होते.

एकूण २५ एकरपैकी चार एकर जमीन उपजाऊ होती आणि ती रासायनिक पीक पद्धतीने कसली जात होती. या जमिनीमध्ये हायब्रीड धान/भात पीक घेतले जात होते. ज्याला बऱ्यापैकी रासायनिक खते व कीटकनाशके लागत होती. पण सविताने हळूहळू पुढील ५ वर्षात स्थानिक सेंद्रिय खतांचा वापर करून ही शेती नैसर्गिक पद्धतीने करण्यास सुरुवात केली. त्यामुळे मातीची गुणवत्ता वाढली.

सध्या या शेतीत 'रत्नाचुडा', 'हलगा' व 'हेग्गी' नावाचे देशी वनाचे धान/भात पीक घेतले जाते. यातून निर्माण होणारे उत्पादन त्यांच्या घरी खाण्यासाठी पर्याप्त होते. त्यातूनही त्या आपल्या मित्रांना यातील काही हिस्सा देत असतात. गेल्या अनेक वर्षापासून त्यांचे शहरी मित्र शेतीच्या प्रमुख कार्यनिवेशाच्या वेळी गावात येऊन राहतात व त्याचा सर्व खर्चही स्वत: करतात. त्यामुळे सविताचे शेती काम थोडेफार सोपे होते. त्याच्यातूनच दरवर्षी ऑगस्ट महिन्यात 'मुनगारू' नावाचा २ दिवसाचा "लागवड महोत्सव" आयोजित करण्याची प्रथा पडली.



कोकम फळापासून कोस्मेटिक इडस्ट्रीजमध्ये वापरतात ते कोकम बटर

**सविताच्या शेतावर वर्षभर पुरेल इतके काम उपलब्ध आहे व त्यातून तिच्या शेतावर राबणाऱ्या लोकांना रोजगार उपलब्ध होतो.**

### कोकम फेस्टिवल

भारतीय प्रजातीचे कोकम नावाचे फळाचे झाड आहे. त्याला बारीक फळे लागतात. प्रथम लाल रंगाची ही फळे जशी पिकातील तशी जांभळया रंगाची होतात. ही फळे चवीला आंबट असतात पण त्यांच्यामध्ये थोडाफार गोडपणा पण असतो. या फळामध्ये बरेच औषधी गुण देखील असतात.

'कोकम फेस्टिवल' म्हणजे कोकम फळाचा झाडापासून बरणीपर्यंतचा प्रवास. फळे तोडून त्याच्यावर प्रक्रिया करून संरक्षित ठेवली जातात. लोक जंगलात फिरून अशी फळे गोळा करतात. ती सर्व एकत्र करतात. पुढची प्रक्रिया म्हणजे फळावरचा मांसल भाग बाजूला करून त्याच्या बिया वेगळ्या करणे ज्यांच्यापासून एक प्रकारची कोको पावडर सारखी पावडर बनवणे जी विशेषतः क्रीम, कन्डीशनर, लिपस्टिक, साबण इ. कोस्मेटिक पदार्थांमध्ये वापरतात. त्या शिवाय मऊ मांसल भाग थरावर थर देऊन मध्ये साखर किंवा गूळ घालून ठेवतात व त्यापासून जाम व सरबतसाठी वापरला जाणारा रस बनविला जातो.

फळांचा सुकलेला चाक पाककृतीसाठी तसेच औषधी बनवण्यासाठी एजंट म्हणूनही वापरतात. कोकमच्या फळांपासून जाम, सरबत, वाईन, रसम इ. पदार्थ बनवितात. येथे कोकम बियांपासून बटर बनवतात. यात कोकमच्या बिया उकळून घेऊन त्या जात्यावर भरडल्या जातात. त्यातून बाहेर पडणारा मऊ भाग बाजूला केला जातो. तोच भाग कोस्मेटिकमध्ये वापरतात.

सविताच्या घरी असलेल्या २ बैल, ४ गायी व ३ कालवडीसाठी भाताचा तणस वैरण म्हणून वापरला जातो. बाहेरून देखील त्याला

सवितासारख्या व्यक्ती केवळ आवड म्हणून अशा प्रकारे वेगळेपणाने असे काहीतरी करतात हे खरे तर किती कौतुकास्पद आहे ! ते आपल्या मनातले बोलतात, मनातले करतात, ब्रॅन्ड बनवत नाहीत, जास्तीत जास्त लोकांनी त्यांच्याकडे जावे या प्रयत्नात असतात. फेस्टिवल साजरे करतात, परत मुळाकडे जातात, विसरलेले अन्नपदार्थ शोधून त्याचा आस्वाद घेतात/देतात. स्वतः आनंद साजरा करतात व इतरांना सहभागी करून घेतात, इतरांना आनंद देतात. खरच एक वेळ त्यांना त्यांच्या ठिकाणी जाऊन भेटावेच वाटते. त्यांच्याकडून शिकावे, त्यांचे कौतुक करावे आणि त्यांच्या या तपस्येचे गुणगान गावे असेच वाटते.



कोकम फेस्टिवल दरम्यान जंगलातून कोकम जमा करून त्यावर प्रक्रिया करताना

**Lakhmi Unnithan**

Editor, Agriculture World, 206,
Narmada Apartment,
Near Don Basco School, Alaknanda,
New Delhi-110019
Email : dr.lakshmi@live.in

मराठी अनुवाद : दत्ता पाटील, नागपूर

*Source : Conserving Local Culture and Enhancing Local livelihoods, LEISA India September, 2019.*



आदिवासी महिला धान्य कापणीनंतरच्या प्रक्रिया करतांना

# कृषीपर्यावरण किंवा पर्यावरण अनुकुल शेतीपध्दतीस प्रोत्साहन देण्यासाठी क्षमता वाढविणे हिच गुरुकिल्ली आहे.

Siva Muthuprakash and Shashank Deora

**कृषीपर्यावरण शेती पध्दतीचा व्यापक अवलंबनासाठी प्रादेशिक आणि सामुदायीक स्तरावर काही अडचणी आहेत. ओरीसातील आदीवासी जमातींच्या असे आढळून आले की, महिला शेतकऱ्यांवर लक्ष केंद्रीत करून क्षमता वाढविण्यासाठी उपक्रम राबविणे मोलाचे ठरेल ज्यामुळे शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब वाढून राहणीमान सुधारणा, कौटुबिंक पोषण सुधारणा आणि सबलीकरण यासारखे अनेक फायदे या कुटुंबांना मिळतील.**

सर्वसाधारपणे सेंद्रीय शेती पद्धती वाढविण्यातील प्रमुख अडचण शेतकरी संबंधीत आव्हाने आहेत. ज्ञानाची मर्यादा आणि बाहेरील हस्तक्षेप प्रक्रीया ही क्वचितच आव्हाने मानली जातात. सेंद्रीय शेती नेहमी मजुर/श्रमआधारीत असल्याने शेतकरी सेंद्रीय शेतीला प्राधान्य देत नाहीत.

## संबधीत उदाहरणे

तामिळनाडूच्या तिरुवल्लूर जिल्ह्यातील आणि कर्नाटकातील म्हैसूर जिल्ह्यातील गटांशी झालेल्या संवादात कोणतेही दुमत आढळले नाही. धानाच्या शेतात शेणखत टाकण्यासाठी ते शोधून गाडी भरण्यासाठी मजूर लावण्यापेक्षा युरीयाचे एक पोते शेतात फेकणे शेतकऱ्यांना सोईचे वाटते. खरेतर बरेच प्रगतीशील शेतकऱ्यांच्या मते त्याच्या सहकारी शेतकऱ्यामध्ये प्रेरणेचा अभाव हे सेंद्रीय शेती वाढविण्यासाठी मोठे आव्हान आहे.

या उलट, ओरीसाच्या कंधमाल आणि कोरापुर जिल्ह्यामधील आठ गावातील सर्वेक्षणातून असे दिसून आले की, सेंद्रीय शेतीत लागणारे श्रम व मजूर हा अडथळा आहे, असे शेतकरी मानत नाही. पाच वर्षापुर्वी तृणधान्य आणि इतर भरड धान्याचे बियाणे फेकीव पद्धतीने

पेरणी करणारे शेतकरी आजकाल रोपांची रोवणी करतात. त्यामुळे अधिक मजुर लागतात याची त्यांना जाणीव आहे परंतु अधिक उत्पादन आणि उत्पन्नासाठी दुसरा उपाय नाही. ओडीसातील कंधकाम जिल्ह्यातील एका पुरुष शेतकऱ्याच्या मते "शेती ही आमची उपजिवीका आहे. त्याला आम्ही कष्टाचे काम कसे म्हणू शकतो?"आणि असेच मत गावोगावी व्यक्त केले गेले. तरी सुद्धा येथे ही इतर ठिकांणांसारखेच अतिकष्टाचे काम महिलाच करतात.

विशेष म्हणजे, कंधमाल आणि कोरापुटमधील अनेक खेड्यांमधील शेतकरी महिलांना सामाजिक समज असल्याने त्या शेतकऱ्यांच्या शेतात पेरणी आणि कापणीच्या वेळी विनामुल्य कामे करतात. जरी त्यांची जमिनधारणा कमी जास्त असली तरीही अधिक श्रम करण्यास त्या मागेपुढे पाहत नाही.

**ह्या सामुदायीक मजुर व्यवस्थापनामुळे रोवणी आणि ओळीतील पेरणी यासारख्या नव्या पद्धती शिकण्यास आणि अवलंब करण्यास उपयुक्त होते.**

### दृष्य फायदा प्रोत्साहीत करतो.

कंधमाल जिल्हयातील शेतकऱ्यांशी झालेल्या संवादातून असे दिसून आले की, जवळपास सर्वच शेतकरी शेतीवर निर्वाह करतात परंतु त्यांचा बाजाराशी निविळा किंवा शेतीमाल विकण्यासाठी सुद्धा संबंध नाही. तथापि, त्यांच्यातील तीन चतुर्थांश शेतकरी पीक नसणाऱ्या कालावधीत वाढणारा घरगुती खर्च भागविण्यासाठी इतर राज्यात स्थलांतर करतात. या शेतकऱ्यांसाठी रोवणी हे नविन पद्धत असून ७० टक्के अधिक शेतकरी हे शेती कामातील सर्वात कठीण काम मानतात. तरीही उत्पादन आणि उत्पन्नातील दृश्य फायद्यामुळे प्रोत्साहित करणारी यंत्रणा गेल्यानंतर सुद्धा अवलंबनात आणि सातत्यात काहिच फरक पडला नाही.

कोरापुट जिल्हातील महिला शेतकऱ्यांच्या अनेक गटांनी सेंद्रीय शेतीच्या काही पध्दती अवलंबल्यामुळे त्यांच्या शेतातून विविध पिकांचे अधिक उत्पादन मिळाले. त्यामुळे संपूर्ण कुटुंबासाठी पोषक आहारात वाढीसोबत रोखीच्या उत्पन्नातही वाढ झाली.

त्याचप्रमाणे कलहंदी जिल्ह्यातील शंभराहून अधिक शेतकरी गटांनी तीव्र बियाणे कमतरतेनंतरही बिगर बीटी कापुस पिकवणे सुरुच ठेवले आहे. त्यासाठी त्यांनी बियाणे संकलन, संवर्धन आणि पुर्नवापर करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केला.

### क्षमता वाढविण्यासाठी गरज

ओरीसाच्या एका दशकाच्या सरासरी उत्पन्नाची पातळी हे दर्शवते की राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत जवळपास सर्व प्रमुख पिकांचे उत्पादन लक्षणीय प्रमाणात कमी आहे. त्याच ब्लॉकच्या(तुमडीबांध) गाचेरगण व सोडाकीया या खेडयांमध्ये शेतीच्या उत्पादनात, शेती पढतीत आणि उत्पन्नाचा विशेष फरक दिसून आला. जेव्हा की ही दोन्ही खेडी दोन किलोमीटर अंतरावर आहे. दोन्ही खेड्यामध्ये एकच जमात असून गाचेरगण येथील शेतकरी विविध सेंद्रीय शेती पद्धती आणि शेतीमालाचे बाजारात विक्री करण्याबद्दल जागरुक आहेत.

त्यांच्या विकासात शेतीच्या तंत्रज्ञानाबद्दलचे ज्ञान हा महत्वाचा घटक आहे. विशेष म्हणजे आम्ही सोडकीया गावातील एका वस्तीत दोन शेतकऱ्यांच्या मुलाखती घेत असतांना ८ ते १० महिलांनी आमच्या सोबत आलेल्या सामाजिक कार्यकर्त्याला तनसावरील ढिंगरी (मशरुम) लागवडीसंबधी प्रात्यक्षिक देण्याची विनंती केली. काही



कंधमाल जिल्ह्यातील तुमडीबंध तालुक्यातील महिला डाळींची मळणी करतांना



कंधमाल जिल्ह्यात सोडाकिया गावात शेतकऱ्यांशी गट चर्चा करित असतांना

वेळाने काही जणी धानाचे तणस (पेंढा) हातात घेवून तेथे पोहचल्या आणि अखेरीस अर्ध्यातासाचे प्रात्यक्षिक  तेथे झाले. त्यावरुन त्यांची जाणून घेण्याची पातळी व इच्छाशक्ती समजली.

अनेक गावांमध्ये केलेल्या सर्वेक्षणातून असे दिसून आले की विविध विकास यंत्रणेद्वारे दिलेल्या सर्व प्रात्यक्षिकांचे अवलंबन ८५ टक्के पर्यंत आढळून आले. तथापि, कोणत्याही प्रकारच्या सेंद्रीय व्यवस्थापनाचे अवलंबन ४०टक्के पेक्षा कमी आहे. ह्याची राष्ट्रीय सर्वेक्षणातुन खात्री पटते की ४० टक्के शेतकरी सामाजिक संस्थेसोबत संपर्क साधून वापरासाठी १० टक्के अवलंबन करतात. अवलंबन दर आणि मूलवर्धनाच्या साह्याने शेतकऱ्याचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांची क्षमता वाढविणे कार्यक्रमातून इतर राज्यांच्या तुलनेत कमी उत्पादनाचे अंतर भरून निघू शकते. सेंद्रीय पद्धतीसाठी पद्धतशीर क्षमता वाढविणे आणि विपणन सहाय आदिवासींची धोका पत्करण्याची ताकद वाढविते.

## महिला शेतकऱ्यांची महत्वाची भूमीका

मर्यादीत विस्तार बहुतेक महिला सामाजिक सांस्कृतिक निर्बधामुळे कित्येक महिला पुरुषांसोबत शेतीत गुंतल्या आहेत. तरीही, मागील चार वर्षापासून महिलांचा सहभाग वाढीत आहे. एका फोकस ग्रुप चर्चेदरम्यान, अचानकपणे कोणत्याही चर्चेपासून दूर राहणारी महिला उठली आणि मोठयाने सांगू लागली की, आम्ही काही वर्षापुर्वी पुरुषांसमोर आम्ही घराबाहेर सुद्धा येत नव्हतो, परंतु आता त्या जिल्हा मुख्यालयात प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उपस्थित राहतात आणि घरच्या शेतीत आपले म्हणने मांडतात. अशा प्रकारे, प्रशिक्षण कार्यक्रमांनी महिलांना एकत्र करून सेंद्रीय शेतीच्या अवलंबनासाठी आत्मविश्वास वाढविला.

या व्यतिरिक्त, महिला शेतकरी पुरुष शेतकऱ्यापेक्षा आपल्या घरातील आरोग्यासाठी आणि पौष्टीक आहारांना जास्त प्राधान्य देतात. कंधमाल आणि कोरापुट यासारख्या जिल्ह्यात महिला शेतकऱ्यावर लक्ष केंद्रीत करून क्षमता वाढविण्यासाठी उपक्रमांना मोलाचे मानून रोजगाराची सुधारणा, शाश्वत शेती पद्धातीचे अवलंब करणे आणि महिला शेतकऱ्यांना सशक्तीकरण यासारखे अनेक फायदे मिळतील. याकडे लक्ष पुरवीत आहे.

**Siva Muthuprakash and Shashank Deora**
Vikas Anvesh Foundation,
6th Floor, Galore Tech Park, LMD Chowk,
Bavdhan, Pune - 411021
www.vikasanvesh.in
Email : sivam@vikasanvesh.in

मराठी अनुवाद : डॉ. विनोद अ. खडसे

*Source : Scaling up agroecological farming Capacity building is the key,  LEISA India September, 2019.*

# शेतकरी पृथ्वीचा पालनकर्ता

**C F John**

**अशा वेळेस, जेव्हा आपल्या विचारांना व प्रगतीला कुठल्याही मर्यादा नसतात, तेव्हाच शेतकरी व बियाणे हे मर्यादेत राहून जीवनाचे अमर्याद जग फुलवितात. आपण सतत जे शोधत असतो ते सूप्तावस्थेतील खजिन्यासारखे या गतिशील शरीरात, आपल्या शरीरात व पृथ्वीमध्ये असतात. शेतकरी या मातीत जे पालनपोषण करतात ते म्हणजेच काळजी, जपणूक, प्रतिकार, जगण्याची, काळजी वाहक, एकत्वाची भावना व पावित्र्य यांचे विश्व होय.**

पर्यावरण व समाजाला हानी पोहचविणाऱ्या तथाकथीत मानवी पद्धतींना आळा घालायचा असेल तर आज शेती व एकंदर पृथ्वीची काळजी घेणाऱ्या पद्धतीची पुर्नस्थापना करणे आवश्यक आहे. शेती ही अन्न उत्पादनाचे शास्त्र वापरण्याची तांत्रिक पद्धती नसून ती त्यात असलेल्या लोकांसाठी एक समृद्ध, सामाजिक पद्धतीची मुळे खोलवर रुजलेली संस्कृती आहे. कृषीशास्त्र म्हणजे शेती व शेती म्हणजे जबाबदारी पाळणे ज्या मध्ये प्रजनन व संगोपन येते. बीज, ओलावा, हवा, असुरक्षितता व कीड व तणांचा प्रार्दुभाव सुद्धा यात येतो. औद्योगिक शेती ही त्याच्या विरुद्ध आहे.

या संदर्भात आम्ही सर्जनशील मनाच्या एका लहान समूहाने एफ.टी. अे के नावाच्या शेतकरी गटासोबत वेळ घालविण्याचे ठरविले व विविध विषयाच्या कला प्रकल्पांद्वारे शेतीची संस्कृती ज्याच्या मध्ये

शेतकऱ्यांद्वारा आपसातील आदानप्रदानामुळे स्थानिक बियाण्यांचे संवर्धन शक्य होते.



पर्यावरण व सामाजिक संदर्भाला स्थान आहे. त्यावर कार्य करण्याचे सुरू केले. हा लेख गेल्या तीन वर्षात शेतकऱ्यांसोबत कार्य करताना अडखळलेल्या विविध घटकांशी संबंधित आहे. या चौकटीत माझ्यासोबत इतर अनेक शुभ चिंतकांसोबत व्हिज्युअल कलाकार अझिज टी.एम. कवी, बी.टी. जयदेव व नाटक कलाकार – शिवदास पोईकाक व कवी एम.पी. प्रथिश. हे सहभागी होते.

## बदलती मूल्ये

आजपासून काही दशकांपूर्वीपर्यंत या देशातील बहुसंख्य लोक हे शेती करीत होते. किंवा काही कारणास्तव शेतीशी जुळले होते. किंवा शेतकऱ्यांना ओळखत होते. आज हे संबंध संपलेले असून त्याचे गंभीर परिणाम आपली संस्कृती, पर्यावरण, खानपान, अन्नाला ओळखणे, वाया घालविणे यावर होत आहे. आता शेती व सर्वसामान्य नागरिकांचे हे संबंध पुर्नस्थापित करणे अति आवश्यक झाले आहे.

जेव्हा लोक शेतीशी जुळलेले होते तेव्हा त्याचा आपल्या सांस्कृतिक संवेदनांवर फार मोठा प्रभाव होता. उदा. अन्नासाठी असलेले खोल/दाट संबंधामुळे अन्नाप्रती वेगळीच सहानुभूती होती. आतापर्यंत आपल्या घरात मुलांना भूमातेने पिकविलेल्या प्रत्येक दाण्याचा आदर करणे शिकविले जात होते. जेव्हा भाताचे शीत जमिनीवर पडल्यास ते हातानी उचलल्या जात होते. झाडूने त्याला झाडणे हे अन्नाचा अपमान समजल्या जात होते. जरी ते आपल्याकडे मुबलक होते तरी आपण ही पद्धत वापरत होतो. आपल्या हातात असलेले अन्नधान्य हे पैशाने न मोजता ते आपल्याला भूमातेने दिलेले वरदान समजत होतो. काही परिस्थितीत प्रत्येक दाणा हा बी असून जीवन जगण्यासाठी अन्न म्हणून वापरले असते. आज ज्या प्रकारे आपण अन्न वाया घालवितो ते आपल्याला अधोगतीच्या पातळीवर नेत आहे.

तसेच राष्ट्राच्या काही विकास प्रकल्पाच्या स्वप्नांसाठी त्या क्षेत्रातील जमिनीवरील अनेक झाडे जाळण्यात आली. मात्र काही छाटलेली झाडे त्यांच्या उरलेल्या मात्रातून काही फांद्या फुटल्या. ते शेतीचा प्रकाश जिवंत ठेवण्याचे पवित्र कार्य बियाणे व आपल्यातील एक करार म्हणून करीत आहेत. जेव्हा देशाचा कायदा हा बाजारपेठ व भांडवली अर्थव्यवस्थेची सुरक्षा वाढविण्यासाठी वापरला जातो. त्याच वेळी शेतकरी मात्र जीवन व आरोग्य याचा विचार करतो.



जिवंत माती ही ग्रहाच्या सजीवतेसाठी महत्त्वाची आहे (मुख्य आहे)

फटाक - फेयर टेन्ड अलायन्स केरलाचा जन्म जेव्हा केरळमध्ये कृषीच्या समस्या अत्युच्च पातळीवर होत्या तेव्हा 2005 मध्ये कोझीकोडचा घटक असलेल्या सर्वात जुन्या अशा सेंद्रीय मालक टॉमी मॅथ्यु यांनी केली. बायनाड मधील 300 कुटुंबे त्याचे पहिले सभासद होते. जे त्यांच्या शेतीमालाला चांगली बाजारपेठ मिळविण्यासाठी व शेतकऱ्यांचा सन्मान केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या मालाला चांगला भाव मिळविण्यासाठी एकत्र आले होते. आता या छत्राखाली 5000 पेक्षा जास्त कुटुंबे असून त्यांनी मलबारच्या पहाडी पट्ट्यातील केरळच्या पहाडी उत्पादनाला माफक किंमतीची बाजारपेठ मिळविण्याच्या प्रयत्नांची सुरवात केली.

संस्थेने सुरवातीला योग्य मोबदला व वाजवी बाजारपेठेमध्ये सहभाग यावर लक्ष केंद्रीत केले. आज संस्था शाश्वत व सेंद्रीय कृषी पद्धती तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यासोबतच जैवविविधता टिकविण्यासाठी एक पीक पद्धतीला नाकारते. ते टर्मिनेटर तंत्रज्ञानाकडे बोट दाखवित आहे. ते लोकांच्या भल्यासाठी बियाणे पुन्हा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. दुसऱ्या पातळीवर ते अन्न सुरक्षतेवर पुन्हा लक्ष केंद्रीत करीत आहेत. एकत्रपणे संवेदनशील शेती पद्धतीचा अवलंब करून फटाक (FATK) च्या 4500 सदस्यांनी पश्चिम घाटातील 15000 एकरपेक्षा जास्त जमीन ही पर्यावरण अनुकूल शेतीत परिवर्तित केली आहे. याचा उद्देश हा आहे की पश्चिम घाटातील विशिष्ट जीव व वनस्पतींचा प्रत्येक सभासदांद्वारे लहान विषुववृत्तीय वने तयार करून जतन करणे. जे आज संरक्षित बायोस्पियर म्हणून घोषित केले आहे. शेतकऱ्यांचा नियम हा जीवनाचा एकमेकांशी संबंध व एकमेकांवरील अवलंबित्व यावर आधारित आहे व त्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्याचा सन्मान करणारा आहे. म्हणून आपण साक्षीदार आहोत की या अगोदर देशात पुष्कळ लोकआंदोलने जी देशाच्या शेतकरी, आदिवासी किंवा मासेमार लोकांनी काही विकासाच्या प्रकल्पाविरुद्ध मातीचे नियम व तिचा जिवंतपणा जपण्यासाठी केली.

आज देशात आपण अनेक प्रकारे निव्वळ फायदा घेण्याचा प्रयत्न करतो. जसे – मासे पकडण्यासाठी आपण तलावात विष टाकतो त्यामुळे आपल्याला पर्यावरण व सामाजिक परिणामांचा विचार न करता तात्पुरता नफा मिळतो. एक चांगला शेतकरी वेगळ्या प्रकारचे नाते व संबंध जपतो. ते मातीचे विश्वस्त/काळजीवाहक सुद्धा असतात. ज्या मातीत ते राहतात. जर ते मातीच्या आरोग्याची काळजी घेतील तरच त्यांची मुले त्या मातीत भविष्यात राहू शकतील. त्यांनी खोलवर मनात बिंबवलेल्या न्यायाच्या कल्पना व जबाबदारीच्या

संवेदना याचे अस्तित्व हे त्यांचे कुटुंब, पिढी व समाजाच्या पलीकडे आहेत.

परंतु आज शेतकरी फक्त त्याच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी व मुलांच्या शिक्षणासाठी जास्त उत्पन्न घेण्यासाठी मजबूत केला जात आहे. ते मुलांना शिकविण्यासाठी मोठी कर्ज घेत आहेत व त्यांची मुले अशा जगात जाण्याचे शिक्षण घेत आहेत ज्यामध्ये शेतीला सन्मान व महत्व दिल्या जात नाही. आपण त्या देशाबाबत काय बोलावे जो आपल्या त्या लोकांना सुरक्षित ठेवून शकत नाही. जे संवर्धनाचा नियम व शाश्वत जीवन जगण्याचा मार्ग दाखवितात. आपण त्यांना असे जीवन जगण्यास मजबूत करतो जे करायला नाही पाहिजे व अशी परिस्थिती निर्माण करतो ज्यामध्ये दुसरा कुठलाही पर्याय नसतो. आमच्या काळाचा हा वेडेपणा.

बाजाराच्या मागणीमुळे वेगळ्या प्रकारच्या वातावरणाची निर्मिती झाली आहे. एक शेतकरी म्हणतो, *"आज आपण आपल्या चवीवरील नियंत्रण घालवत आहोत. आज बाजारपेठ आपल्या स्वत:च्या चवी पासून आपल्याला दूर नेत आहेत. आतापर्यंत चवी या आपण काय पिकवित आहोत यावर ठरत होत्या. आज बाजारपेठा आपली उत्पादने घेतात व त्यांची चव देवून आपल्याला परत देतात. उदा. फणसाचा बर्गर, रोल इत्यादी. आपले स्वयंपाकघर हे फक्त अन्न शिजविण्याचे स्थान नसून ती अन्न व बियाणे जतन करण्याची जागासुद्धा होती. आज आपण जे काम जमिनीवर करतो त्याची चव याला आपल्या घरात, आपल्या स्वयंपाकघरात कमी जागा आहे. आपण आपल्या जमिनीत जे काम करतो ते न समजणाऱ्या बाजारपेठेसाठी आहे व ते घरातील आपले जीवन हे बाहेरच्या जगाने परिभाषित केलेले आहे."* निसर्गाचे सहजीवनाचे तार नष्ट झालेले आहेत.

### बदलते दृष्टीकोन

आज जे लिहलेले असते त्याला ज्ञान समजले जाते. परंतु जे ज्ञान शेतकऱ्यांना असते ते कुठल्या पुस्तकात किंवा ग्रंथालयात नसते. परंतु ते जीवन जगण्यातून आलेले असते. शेतकरी हे ज्ञान व अनुभवाचे अभयारण्य आहेत. आज आपल्या काळात शेतकरी व इतर व्यावसायिक यांचेद्वारा सहभाग, लाभ व हानी यांची एकात्मिक तपासणी करणे संयुक्तिक राहील. यात आपले जीवन जगण्यासाठीचा हातभार, मोठे पर्यावरणीय मुद्दे, उर्जेचा कार्यक्षम वापर व कचऱ्याची निर्मिती व इतर अनेक बाबींचा समावेश असावा. जर कोणाला वस्तूंच्या एकत्रित स्वरूप माहीत नसेल त्याला पालनपोषणाच्या कार्यात सहभागी करण्यात येऊ नये. मूलभूतरित्या त्याच्या कार्याच्या स्वरूपामुळे शेतकरी हा ते करण्यास तयार असतो. सहजीवन व उदरनिर्वाह हा त्यांना असलेल्या जाणिवांचा अविभाज्य भाग असतो. कामाच्या पद्धतीमुळे शेतकरी यासाठी सरावला आहे. सहजीवन व उदरनिर्वाह हा त्याच्या जाणिवांचा एक भाग झाला आहे.

आजचे ज्ञान हे ढोबळमानाने संक्षिप्त आहे. ज्ञानाचा उपयोग हा जीवनासाठी होतो तेव्हाच ज्ञानाच्या हेतूची पूर्तता होते. आज आपण पुष्कळ ज्ञान प्राप्त केले आहे. परंतु त्याने आपल्याला जीवनाचे तत्त्व न ओळखण्याइतपत आंधळे केले आहे. यश व जास्त नफा मिळविण्याची इच्छा ही मारणाऱ्या तणासारखी वाढली आहे. ज्याने आज आपल्या बहुतांश विचारांना, कृतीला व स्वरूपाला झाकून टाकले आहे. एखाद्या वस्तूला तुम्ही बाजारपेठेत मज्जाव केल्यास ती पुन्हा दुसऱ्या स्वरूपात उपलब्ध होते. तसेच एखाद्या समस्येचे निराकरण दुसऱ्या समस्येला जन्म देते. ज्या करिता पुन्हा वेगळे उपाय आपल्याला शोधावे लागतात. आपल्या सर्वांना माहीत आहे की, जीवनाप्रती असलेल्या दुजाभावामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. देशात आज दोन्ही भौतिक तसेच भावनिक व मानसिक समस्या चिंताजनक प्रकारे वाढत आहेत.

पन्नास वर्षापूर्वी आपल्याकडे असे काहीही नव्हते. ज्याला आपण कचरा म्हणत असू. तो तेव्हा परका विचार होता. प्रत्येक गोष्ट कशाला तरी पोषण करण्यासाठी मदत करायची. आज आपल्याकडे कचऱ्याशिवाय व्यापक काहीही नाही. आपण कचऱ्याने झाकलेले आहोत. भारतात आपण दररोज २५,९४० टन प्लॅस्टिक कचरा म्हणून फेकतो. आपण असे मानतो की प्रत्येक समस्या ही दुसऱ्या व्यवसायाचा मार्ग तयार करते व आपण हे सुद्धा मानतो की अशी एक पद्धती आहे जी आपण तोंड देत असलेल्या सर्व समस्यांचे निराकरण करील. जरी आपण आपले सर्व काही गमावले तरी आपण आपली स्वप्ने पुढे ढकलतो. हा खेळ आपण अजून किती काळ खेळत राहणार?

### जीवनाशी पुन्हा जोडण्याचा अभ्यास

आपल्या सारखी मंडळी बाजारपेठ व त्याकरिता असणारे लक्ष्य पूर्ण करण्याकरिता पळणाऱ्या मशिनचा एक भाग बनतो व त्यात स्वत: ला संपवून टाकतो. पत्र शेतकरी जीवन जगण्याच्या वेगळ्या पद्धती दाखवितो आहे. ते वेगळ्या काळात व वेगळ्या गतीने जीवन जगत आहेत. माती, बियाणे, उगवन व उत्पादन याचा वेगळा मार्ग आहे. तो एक वेगळ्या प्रकारचा सावधपणा, थांबणे, धिमा व जाऊ देणारा आहे. आपण धिमा पैसा व धिमे अन्न याला कसे समजतो? व आपल्या काळात धिम्या असण्याचा काय अर्थ होता?

बियाणे व माती ज्याची शेतकरी काळजी घेतो ते जीवनाचे सत्य आहे. शेती ही सावधानता व निरीक्षण होय. तुम्ही काय होत आहे ते पाहू शकता. हात व पाय जे त्यात कळत नकळत काम करतात. ते सहजीवनाचे सत्य जतन करतात. आपल्याकरिता हे लोक ज्यांनी सौंदर्यीकरण समूहाने अनुदानित प्रदर्शनी व इतर मनोरंजन, बियाणे व मातीच्या सौंदर्याची रुची निर्माण केली आहे. तो एक प्रकरच्या तीर्थक्षेत्राचा प्रवास आहे.



शेतकऱ्यांची बाजारपेठ

शेती व साधारण लोकांच्यामधील संबंध पुर्न:स्थापित करण्यासाठी मला वाटते की प्रत्येक नागरिकाने कमीत कमी दोन वर्षे एकात्मिक शेतीत घालवायला पाहिजे. शेती ही बियाणे व मातीसाठी महान आध्यात्मिक महत्त्व ठेवते. मातीत चालणे हे वेगळ्या प्रकाशात चालणे असून एक वेगळा संबंध निर्माण करते. आध्यात्मिक कृतीप्रमाणे बियाणे काढणे, साठवणे, सुरक्षित ठेवणे, लावणे व अदलाबदल करण्याच्या कामामुळे शेतकऱ्यांचे हात, पाय, डोळे व हृदय हे अंधारावर मात करीत आहे. मातीत बियाणे ठेवायच्या पवित्र कार्यामुळे शेतजमीन ही एक प्रकारची मूक प्रार्थना होते.

जेव्हा आपण वेगवेगळ्या व्यवसायातील व्यक्तिमत्वाचा आदर करतो व त्यांचा आम्हाला अभिमान असतो, तेव्हा आपल्यामध्ये असे काही लोक आहेत जे जमिनीवर चालतात व कुठलीही ओळख न दाखवता, कुठल्याही सन्मानाची अपेक्षा न ठेवता दिवसरात्र ते आपल्याला खायला अन्न तयार करतात. परंतु धरतीला सुरक्षित ठेवण्यास मदत करतात. परंतु त्यांची आपल्याला जाणीव नसते. जर आपल्या जखमा भरून काढायच्या असतील तर आपल्याला त्यांच्या जखमांची दखल घ्यावी लागेल. चला आपल्या जखमा, दु:ख, आनंद, एकता व विकास हे जीवनाच्या सत्यात रूजवण्याचा प्रयत्न करू.

**C. F. John**
25, 1st Cross, 1st Main, Byraveshwara Layout,
Hennur Bande, Kalyanagar Post,
Bangalore - 560043, India
Email : cfjohn23@gmail.com
www.cfjohn.com

मराठी अनुवाद : लक्ष्मीकांत पडोळे


*Source : Farmers as custodians of Earch, LEISA India September, 2019.*

## आमच्या मार्फत जाहिरात :

लीसा भारत हे मासिक कृषी विकासाची आवड असणाऱ्या २०००० हून अधिक लोकांपर्यंत पोहचले असून, शाश्वत आणि पर्यावरणास अनुकूल आहे. दर तिमाहीत, मासिकाच्या मुद्रित आणि डिजिटल आवृत्त्या व्यावहारिक क्षेत्राच्या अनुभवांमध्ये रुची असणारे शेतकरी, स्वयंसेवी संस्था, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी, सरकारी विभाग, बँका इ. पर्यंत पोहोचतात.

दोन दशकांहून अधिक काळापासून निर्मित, लीसा भारत मासिक आपल्या व्यावहारिक आणि दर्जेदार सामग्री, आकर्षक डिझाइन, रंगीबेरंगी मांडणी, सुसंगतता आणि वेळेवर निर्मितीसाठी प्रसिद्ध आहे. इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलगू, तामिळ, ओडिया, पंजाबी आणि मराठी अशा वेगवेगळ्या ८ भाषामध्ये या मासिकाची निर्मिती केली जाते.

आम्ही संस्था, कंपन्या आणि विद्यापीठांना त्यांच्या सेवा, उत्पादने, अभ्यासक्रम आणि कृषी विज्ञानाच्या तत्वज्ञानाशी संरेखित असलेल्या घटनाच्या कार्यक्रमांची जाहिरात करण्यासाठी आमंत्रित करतो. अधिक माहितीसाठी श्रीमती रुक्मिणी leisaindia@yahoo.co.in वर संपर्क साधा.




**LEISA INDIA Language Editions**



Kannada, Telugu, Tamil, Oriya, Hindi, Marathi and Punjabi

# कृषक दैनंदिनी शाश्वत उत्पादन व सामुहिक विपणन शेतकऱ्यांसाठी एक नवा मार्ग

कृष्णा राय हा एक प्रयोगशील व उद्योगशील शेतकरी आहे. त्याच्या एक हेक्टर शेतावर त्याने जणू काही भव्य वन परिसंस्थाचे उभी केले असे वाटते. तिथला प्रत्येक प्रयोग एकमेकासी निगडीत व उपलब्ध असाच आहे. प्राणी, पशु, पिके या सर्वाचे खूप सुंदर एकत्रीकरण केल्याचे दिसून येते.

येणाऱ्या माणसाचे अगदी प्रवेशव्दारा जवळच सुमारे ९० मीटर लांबीचा प्लॉस्टिकने बांधलेल सुमारे ९०,००० मास्यांचा तलाव जणू स्वागतच करतो. तिथून पुढे आल्यावर सुमारे ३०० किलो वजनाची डुकरे पाहून एखाद्याचे स्वत:चेच मनोरंजन होते. शेत डोंगर उतारावर असल्याने उताराच्या दिशेने कुंडीमध्ये लावलेल्या झाडांना ठिबक पध्दतीने जोडलेल्या सिरींग पाईप व बादल्या अगदी डेकोरेशन केल्या सारख्या दिसतात. लहान परस बागेच्या मागे ८००० लिटर पाण्याचा तलाव आहे व बदक आणि डुकरांचे घाण हे खाद्य असलेले तन त्यावर तरंगतांना दिसते. डुकरांची विष्ठा व घाण हे बदकांचे खाद्य आहे. त्यामुळे या प्रक्रियेत डासांची उपज होत नाही.

आपल्याला काही ग्रीन हाऊस (शेड) पहायला मिळतात. त्यामध्ये टोमॅटो, चिनी, कोबी व फुलकोबी अशी पिके घेतलेली दिसतात. मध्येच भोपळा व करेला याचे चढवलेले वेल दिसतात. पश्चिमेकडील बाजूला कोंबड्या, बदके व टर्की पाळलेल्या दिसतात.

कृष्णा रायकडे १० गायी आहेत. तेथून दुधाची विक्री होते व गोमूत्र बायोगॅससाठी वापरले जाते. बायोस्लरीचा उपयोग गांडूळ खत निर्मीतीसाठी होतो. अशा विविध प्रयोगाच्या एकत्रीकरणातून कृष्णा रायला दरमहा २००० अमेरिकन डॉलर्स एवढे उत्पन्न होते. हे खरे तर १ हेक्टर जमिन असलेल्या सामान्य शेतकऱ्याच्या उत्पन्नाचा १० पट होईल. गाईंच्या गोठ्यात लागूनच शौचालये आहेत. "शेतातून पोटात व पोटातून शेतात" असे त्यावर लिहीले आहे. मानवी विष्ठा व मूत्र एका वेगळया उबयामध्ये साठवून त्या पासून उत्तम खत बनवले जाते. मानवी व प्राण्यांच्या विष्ठा व मूत्र यापासून कृष्णा राय यानी तर खताची बँकच तयार केली आहे. त्यातून गांडूळ खत, कंपोष्ट खत, कृर्मी वॉश इतर विविध प्रकारची खते तयार केली जातात. अशा रितीने जैविक कचऱ्याचा अत्यंत योग्य पध्दतीने लाभ व उपयोग करून घेतला जातो.

तलावावर एक बल्ब टांगलेला दिसतो. पाहणाऱ्याला त्याचा अंदाज करता येत नाही की तो बल्ब कशासाठी टांगला आहे. पण रात्रीच्या वेळी किड्यांना आकर्षीत करण्यासाठी तो बल्ब असल्याचे ऐकून आश्चर्य वाटते. कारण हे किडे मास्यांचे महत्वाचे खाद्य आहे. आणि



किटकांना आकर्षित करण्यासाठी डपक्यावर लटकविलेला विजेचा दिवा

म्हणून त्या किड्यांना आकर्षित करण्यासाठी तो बल्ब लावलेला आहे. शत्रू किडे व विविध रोगावर नियंत्रण आणण्यासाठी कडूलिंब व तत्सम उग्र वास असलेल्या वनस्पतीच्या पानापासून जैविक किटक नाशके तयार केली जातात. कृष्णा राय म्हणतात की "मानवी व प्राण्याचे मूल्य किटक नाशक म्हणून प्रभावी ठरते."

कृष्णा राय त्यांची शेती "सेंद्रिय शेती" म्हणून पराकृतींत करण्यासाठी दोन दशके घालवली आहेत. तेव्हा कुठे आपल्या खांद्यावर 'सेंद्रिय' असे बिरुद लावतात. ते स्वत: सोटॅगकृषी आणि सशोधन केंद्राचे मूख्य कार्यकारी अधिकारी पण आहेत. त्यांच्या गावात सेंद्रिय शेतीला त्यावेळीच सुरूवात केली. त्यांच्यामध्ये असलेल्या नेतृत्व गुणामुळे ते इतर अनेक शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीकडे प्रोत्साहित करू शकले. आता तर या गावालाच संशोधन केंद्र म्हणतात. कारण सतत काही ना काही नविन प्रयोग, अभ्यास व संशोधन सुरूच असते. त्यातला महत्वाचा भाग म्हणजे 'सामूहिक विपवन' यामुळे तर संपूर्ण गावाचाच काया पालट झाला. शेती अशा पध्दतीने केली तर शेतकरी कुटुबांचे जीवनच बदलू शकते यांचे हे ज्वलंत उदाहरण आहे. शाश्वत कृषि उत्पादन व सामूहिक विपवण या अशामुळे नेपाळच्या पूर्व भागातील, डोंगराळ भागातील 'इल्लाम' जिल्हा हा श्रीमंत जिल्हा म्हणून गळला जातो. या जिल्हात सर्वांत कमी पलायन होते व सर्वात कमी गरिबी आढळून येते. कृष्ण रायच्या शब्दात सांगायचे तर "बाजार पेठेकडून उत्तेजीत करणारे योग्य तंत्र शेतकऱ्यांच्या हातात येणे हा शेतकऱ्यासाठी एक नवा मार्ग आहे.

*डॉ. राजेंद्र उपरेटी, राष्ट्रीय कृषि संचालनालय, विराट नगर मोरंग, नेपाळ यांनी ही कथा सर्वश्रत केली. त्यांना आपण upretyr@yahoo.com वर संपर्क साधू शकता.*

मराठी अनुवाद : श्रीमती ज्योती नगरकर

*Source : Farmers as custodians of Earch, LEISA India September, 2019.*

# भारतातील कृषी पर्यावरणासाठी महिलांची साखळी शक्ती

**A photostory by Soumya Sankar Bose and Amrita Gupta**

**अमृतभूमी या संस्थेने कर्नाटकात बेंगलोर जवळ कृषी पर्यावरण शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन केले आहे. पर्यायी शेतीचे मॉडेल या संस्थेने निर्माण केले आहे. ला व्हिया कंम्पॅसिनचे सदस्यत्व असलेल्या या संस्थेच्या सेंटरव्दारे 'शेतकरी ते शेतकरी' या तत्वाला अनुसरून प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणामध्ये कृषी पर्यावरण, शेतकऱ्याचे हक्क, अन्य सुरक्षितता व सामाजिक न्याय या मुद्याना केंद्रस्थानी ठेवून प्रशिक्षणाची आखणी होते. या केंद्राच्या समन्वयक चूक्की नन्जून्दास्वामी म्हणतात. ''निसर्गाची हानी टाळण्यासाठी कृषी पर्यावरणीय मूल्य असलेल्या स्थानिक वाणांच्या बियाणांचे संवर्धन व पारंपरिक कृषीक्रमण करण्यासाठी एका व्यास पिठाची गरज होती हे आम्हाला माहित होते ''**

व्यावसायिक व औद्योगिक शेती पध्दतीमुळे बहुतांश ग्लोबल साउथच्या महिला शेतकऱ्यांचे अस्तित्व नाहिसे झाले आहे. भारत त्याला अपवाद नाही. परंतू आता भारताच्या झिरो बजेट नैसर्गिक शेती पद्धती (आता सामुदायिक केलेली नैसर्गिक शेती या नावाने जास्त प्रचलित आहे.) जी जवळपास एक दशलक्ष लहान शेतकरी महिलाद्वारे करण्यात येत आहे. ज्यांना पतपुरवठा, जमीन किंवा व्यावसायिक बियाणे अल्प अशी मदत मर्यादित उपलब्ध होता त्या या पद्धतीच्या सर्वात मजबूत पुरस्कर्त्या बनल्या. त्यांच्या सामुदायिक साखळी व स्वयंसहायता गटांद्वारे त्यांनी कृषी पर्यावरण पद्धती गावागावात वाढविली. घराचे पोषण, उत्पन्न व जमिनीचे आरोग्य सुधारण्यासोबतच त्यांची स्वत:ची व्यावसायिक एजन्सी व प्रतिष्ठासुद्धा वाढविली. त्यांच्या कार्यपद्धतीत स्त्रीवादी तर्क हा पारंपारिक बाजारपेठेच्या पद्धतीपेक्षा वरचढ होता. अर्थात कुटूंबाचे पोषण, मिळवत व जमीनीचा पोव सुधारणेसाठी महिला कारणीभूत आहेत. त्या दृष्टिकोनामुळे राजकीय तणाव व विवादसुद्धा तयार झाले.

आंध्र प्रदेशात महिला स्वयंसहायता गटांनी पर्यावरण पूरक शेतीचे तत्त्वे गावोगावी पसरविल्या आहे. या तळागाळातल्या महिला शेतकऱ्यांशिवाय या पद्धतीचे प्रमाण वाढविणे अशक्य होते. जे आज ६,००,००० शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले किंवा या दशकाच्या शेवटपर्यंत ६ दशलक्ष उद्दिष्ट असलेल्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचेल. कार्यक्रमाचे



महिलांच्या नेटवर्क व बचत गटांद्वारे कृषी पर्यावरणाचे मॉडेल गावोगावी पोहचले.

बहुतांशी कर्मचारी व प्रशिक्षक महिला शेतकरी आहेत.

त्यापैकी काही या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा (भारतात सध्या चालू असलेली दु:खद घटना) तर काही मानवी तस्करीतून सोडविलेल्या आहेत. जवळपास सर्व जातीभेदाच्या बळी आहेत.

त्यापैकी महिलांचा एक गट एकत्र येऊन त्यानी आधी असलेली जमीन भाड्याने शेतीसाठी घेतली. त्यानी आपसात त्यांचे कौशल्य, ज्ञान व श्रम हे त्यांच्या कुटुंबासाठी विषमुक्त अन्न तयार करण्यासाठी एकमेकांसाठी वापरले. अतिरिक्त उत्पादन त्यांनी त्यांच्या शेतीमाल दुकानातून विकले. तसेच भाजीपाला ग्राहकांना घरपोच सायकलने पोहोचवला. सूक्ष्म व्यवसाय जो ते वाढता पाहण्यास उत्सुक होते. महिलांनी सामूहिकपणे

त्यांची एक रोटा पद्धती विकसित केली. ज्याद्वारे त्यांना उत्पादन व घराची देखभाल हे दोन्ही एकाच वेळी करणे शक्य होते. इथे स्त्रीवादी तर्क हा पारंपारिक बाजार पेठेच्या पद्धतीपेक्षा वरचढ दिसत होता. महिला शेतीच्या हंगामात एकमेकांना आंशिक मजुरी देतात. ज्यामुळे काढणीपूर्व काळात घरगुती गरजा पूर्ण करता येतात. आर्थिक सुधारणा पलीकडे, कृषी पर्यावरण हे अन्नधान्याची स्वायत्ता, स्वयंपूर्णता व सन्मानच्या स्वरूपात फायदा देते.

कर्नाटकातील गोट्टीगेहल्लीमधील सुजाता व तिचा पती जगदीश जवळपास दहा वर्षांपासून त्यांच्या ४ एकर जमिनीत नैसर्गिक शेती करीत आहेत. रासायनिक शेतीतून परिवर्तन हे आव्हानात्मक होते असे सुजतिाचे म्हणणे होते. परंतु रासायनिक खते व किटकनाशकांचा आरोग्यावर होणारा दुष्परिणामांचा अभ्यास केल्यानंतर त्यांचा निर्धार बळकट झाला. आता त्यांच्या शेतात पाच स्तरीय नैसर्गिक शेती पद्धतीने लागवड केली जाते. एक पर्यावरणीय पद्धती ज्यात शेतीपेक्षा जंगल जास्त दिसते. जगदीश म्हणतो, "माझ्या जमिनीत बहुतेक २०० पेक्षा जास्त प्रकारचे विविध वाण लागलेले आहेत." हे दाम्पत्य केळी, नारळ, पेरू, फणस, रताळी, दाळी व लिंबू यांची लागवड करतात. तसेच त्यांच्या शेताच्या उतारावर कॉफीची प्रायोगिक लागवड करतात. कोंबड्या व बकऱ्या मोकळ्या राहतात. उंच झाडे-सिल्वर ओक व शेवया याचा नैसर्गिक कुंपण तयार करतात व जेव्हा त्यांची पाने गळतात. ही आच्छादनाचे काम करतात व मातीत ह्युमस वाढवितात.

निसर्ग निसर्गाचा सवायावा कृषीकारा संघा हा होन्नुर, कर्नाटका येथील एक स्वयंपूर्ण सहकारी समूह आहे. याचे सर्व सदस्य सामाजिक व




अनंतपूर (आंध्र प्रदेश) येथे शेतजमीन नसलेल्या महिला अनेक शेतकरी आहेत.

जातीचा भेदभाव बाजूला ठेवून एकत्रिपणे नैसर्गिक शेतीचा अवलंब करतात. झिरो बजेट नैसर्गिक शेती ही यशस्वीरित्या वाढण्यासोबतच त्याच्या वाढती लोकप्रियतेमुळे राजकीय आव्हाने व वादसुद्धा निर्माण झाले. झिरो बजेट नैसर्गिक शेतीत जमिनीतील सूक्ष्म जीवाचे कार्य वाढविण्यासाठी गायीचे शेणखत व गोमुत्र याचा वापर हा केंद्रस्थानी आहे.

काही समीक्षकांच्या मते, काही समुदायांना यामध्ये दूर ठेवण्यात आले व या कार्यक्रमात जनुकीय रूपांतरित बियाणांच्या भूमिकेबाबत गोंधळाची स्थिती आहे. आंध्र प्रदेश सरकारद्वारा जीएम व संकरित बियाणे वापरण्यास बंदी आहे तर काही गटांनी त्याच्या वापराला मान्यता दिली. याप्रकारे झिरो बजेट नैसर्गिक शेतीने प्राप्त केलेल्या महत्वाला त्याच्या यशस्वीतेबद्दल अनेक शंका आहे. कारण सध्याची परिस्थिती ही

अनंतपूर येथील महिलांचा समुदाय





जगदीश पाच स्तरीय नैसर्गिक शेतीचे मॉडेल अवलंबितात. एक पर्यावरण पद्धती ज्यात शेतीपेक्षा जंगल जात आहे.

फार मोठ्या प्रमाणात औद्योगिक निविष्ठा व तंत्रज्ञाने यावर अवलंबून आहे. शिवाय आंध्रप्रदेश हा भारताचा मोठा बीटी कापसाचा पट्टा आहे.

बहुतांश जगात बायम्मा रेड्डीसारख्या महिला या देशी बियाणांच्या संरक्षक राहत आलेल्या आहे. कृषी पर्यावरणाद्वारे त्यांच्या ज्ञानाची संपत्ती व शेतात असलेल्या भूमिकेला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले आहे. जेव्हा बायम्माचा मुलगा उच्च शिक्षणासाठी गेला तेव्हा त्यांनी त्यांच्या घराजवळ असलेल्या जमिनीवर नैसर्गिक शेती पिढ्यानपिढ्या चालत आलेले ज्ञान व कौशल्य वापरून करायला सुरुवात केली. हे आंध्र प्रदेशातील बालकाबारी पाली भागातील आहे जो देशातील एक सर्वात जास्त दुष्काळग्रस्त जिल्हा आहे. या भागात व्यावसायिक पिके ज्यांना सिंचन व इतर महागड्या निविष्ठा लागतात त्या टिकत नाही असे सिद्ध झाले आहे. अन्नधान्याची विविधता साधण्यासाठी व पीक अपयशी होण्याची जोखीम कमी करण्यासाठी तिने व तिच्या पतीने मान्सूनच्या सुरवातीला नवधान्याची (नऊ प्रकारचे धान्यव मिलेटस् एकत्र पेरणे) पारंपारिक पद्धतीची लागवड केली.



कविता कुरुगंती शेतकऱ्यासोबत चर्चा करतांना

कविता कुरुगंटी या "आशा" द अलायन्स फॉर सस्टेनेबल ॲण्ड होलिस्टिक ॲग्रीकल्चरच्या संस्थापक आहेत. त्या 'मकाम' सोबत संबंधित आहेत. ज्यात राष्ट्रीय स्तरावर १२० पेक्षा जास्त वैयक्तिक व महिला शेतकऱ्यांचा समूह आहे. अनेक स्वयंसेवी संस्था, संशोधक व कार्यकर्ते, भारताच्या २४ राज्यातून एकत्र येऊन ते भारतात महिला शेतकऱ्यांना योग्य सन्मान व हक्क मिळविण्यासाठी काम करीत आहेत. कविता यांनी स्पष्ट केले की, महिला पूर्वीपासून रोवणी, निंदण व कापणी यासारख्या मेहनती शेतकामात गुंतलेल्या होत्या. तसेच त्यांनी सांगितले की, "जशा शेती बाजारपेठा तणनाशक व मशिनीवर जास्त अवलंबून राहायला लागल्या. पुरुषांनी निर्णयप्रक्रिया ताब्यात घेतल्या. कृषी पर्यावरणाचा अवलंब केल्यामुळे महिलांना त्यांच्या निर्णय प्रक्रियेचा हक्क मिळणे शक्य झाले.

*या पानावरील फोटो हे सौमया संकर बोस द्वारा घेतलेले आहेत. अम्रिता गुप्ता यांनी लेखन केले व ॲग्रो इकोलॉजी फंडसोबत काम केले. संपर्क इमेल : amritaagroecologyfund@gmail.com*

*ही चित्रकथा व शेतीला भेटी, फेब्रुवारी २०२० मध्ये दक्षिण भारतात एक आठवड्याच्या अनुभवाच्या देवाणघेवाणसाठी झालेल्या कार्यशाळा यावर आधारित आहे. ज्यामध्ये ३० पेक्षा जास्त देशातील जवळपास शंभर कृषी पर्यावरण पद्धती वापरणारे वकील, संशोधक व निती ठरविणारे सहभागी होते.*

मराठी अनुवाद : श्री. लक्ष्मीकांत पडोळे

*Source : The Power of women's networks for agroecology in India Farming matters- October 2020*